# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 10/02/2024 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०९/०२/२०२४ चे १६.०० वा. ते १६.२० वा. दरम्यान पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे अरोली हद्दीतील ११ किमी अंतरावर मौजा खापरखेडा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोस्टे अरोली स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता अरोली गावाचे कॅनलचे रोडने एक रेतीने भरलेला ट्रॅक्टर खापरखेडा येथे अवैद्य रेती वाहतुक करतांनी मिळुन आलेल्या सोनालिका कंपनीचा निळया रंगाचे बिना क्रमांकाचा मुंडा असलेला ट्रॅक्टर व बिना क्रमांकाची ट्रॉलीचा **चालक आरोपी नामे—दिलीप बारेलाल चौधरी वय ४० वर्षे, रा. अरोली. व मालक नामे— अमोल धनराज पिसे, वय २८ वर्षे, रा. चोखळा ता. मौदा** यांचे सांगणेवरून चालक अवैदयरीत्या रेती वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपींविरूद्ध ३७९, १०९, ३४ भा.द.वी सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींच्या ताब्यातून १) सोनालिका कंपनीचा निळया रंगाचा बिना क्रमांकाचा मुंडा असलेला ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती ५,००,०००/—रूपये २) १ ब्रास रेती किंमती ५०००/— रू. असा एकुण ५०५०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात अरोली येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक किशोरकुमार वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक सुशिलकुमार सोनवने, पोलीस अंमलदार मनिश सुखदेवे यांनी पार पाडली.

## दागिने चोरी

**पो.स्टे. कन्हान**:— अंतर्गत इंदिरानगर सुंदरबाई गजबिये लेआऊट कन्हान येथे दिनांक ०७/०२/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. इंदिरा मुरलीधर चिखले, वय ५५ वर्ष, रा. इंदिरानगर सुंदरबाई गजभिये लेआऊट कन्हान हीचे नातेवाईक शांताराम खोरगडे रा. गडमी ता. सावनेर यांचे घरी निधन झाल्याने गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे खूल्या दरवाजा बघून घरात प्रवेश करून फिर्यादीचे जांभळ्या रंगाचा हेन्डबॅगचे पॉकेट मधील १) सोन्याचे पोत ४० ग्रॅम जुना वापरती किंमती २) सोन्याचा बकूडी हार ३५ ग्रॅम जुना वापरती ३) सोन्याचा मणी ६ ग्रॅम जुना वापरती ४) सोन्याचा गोप १५ ग्रॅम जुना वापरती ५) सोन्याची नथ २ नग ६ ग्रॅम जुना वापरती ६) सोन्याचे डोरले ०२ ग्रॅम जुना वापरती ७) सोन्याचा ओम लिहिलेला लॉकेट १ ग्रॅम जुना वापरती ८) सोन्याचा टॉप्स कानातले ८ ग्रॅम जुना वापरती ९) सोन्याचे छोटे टॉप्स ३ ग्रॅम जुना वापरती १०) सोन्याचे कानातले ०१ जोडी टॉप्स ७ ग्रॅम जुना वापरती अशा एकूण १२३ ग्रॅम सोन्याची किंमती ४,९२,०००/— रू. व चांदिचे मनघटे व चाळ जुना वापरती एकूण ३५ ग्रॅम किंमती १४००/— रू. अशा एकुण माल ४,९३,४००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीने दिनांक ०९/०२/२०२४ रोजी तोंडी रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस निरीक्षक पाटील, पोनि उमेश पाटील, सपोनि राहुल चव्हान, पोउपनि हारगुडे, राठोड यांनी भेट दिली असुन आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चव्हान मो. नं. ८८८८०९२४२७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**